
# स्मृतिगंध

## सत्यशोधक डॉ. श्रीराम गुंदेकर



संपादक
डॉ. हंसराज भोसले

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका

संपादकीय ........................प्रा.डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले १- ८
पत्रास कारण की..........................सारिका श्रीराम गुंदेकर ९-१२
सहजीवनाची 'साठवण'...................संजीवनी श्रीराम गुंदेकर १३-२३

विभाग - एक

## आठवणीतले डॉ. श्रीराम गुंदेकर

| | | | |
|---|---|---|---|
| १. | धाकट्या भावाने माझ्याआधी जाण्याची घाई केली... ! | डॉ.आ.ह. साळुंखे | २४-२७ |
| २. | चळवळसन्मुख 'सत्यशोधक' प्रा. श्रीराम गुंदेकर | डॉ. बाबा आढाव | २८-३० |
| ३. | 'लास्ट' लंच आणि मला भेटलेला दुसरा 'राम' | प्रा. डॉ. आनंद पाटील | ३१-३९ |
| ४. | नावात 'श्रीराम' आणि हृदयात 'जोतिबा' असणारे आठवणींतले डॉ. गुंदेकर | प्रा. डॉ. गेल ऑम्व्हेट डॉ. भारत पाटणकर | ४०-४२ |
| ५. | सत्यशोधक डॉ. श्रीराम गुंदेकर | डॉ. नागनाथ कोतापल्ले | ४३-४८ |
| ६. | डॉ. श्रीराम गुंदेकर सत्यशोधक चळवळीचे नवे पर्व | डॉ. रावसाहेब ढवळे | ४९-५४ |
| ७. | डॉ. श्रीराम गुंदेकर 'ज्ञानक्षितिजा'चा पांथस्थ | कॉ. डॉ. विठ्ठल मोरे | ५५-५९ |
| ८. | भारतीय संविधान, लोकशाही आणि सत्यशोधकीय परंपरा | कॉ. डॉ. धनाजी गुरव | ६०-६७ |
| ९. | डॉ. श्रीराम गुंदेकरांच्या काही आठवणी | डॉ. अशोक चोपडे | ६८-७० |

Scanned with CamScanner

# संपादकीय...

भारतीय संस्कृतीत सत्यशोधनाच्या दोन छावण्या (विचारप्रवाह) पुरातन काळापासून अस्तित्वात आहेत. एक वैदिक, तर दुसरी अवैदिक. पहिली अध्यात्म-पातळीवरची. तीत वाद-युक्तिवाद, चर्चा यांचा समावेश होतो; तर दुसऱ्या पद्धतीमध्ये अध्यात्माच्या 'ईश्वर', 'स्वर्ग', 'नरक' इत्यादी कल्पना आणि विचार याविरुद्ध काही मीमांसकांनी चिंतनपूर्वक मोठी भर घातली आहे. बळीराजापासून विकसित होऊन चार्वाक-बुद्ध-महावीर यांच्यापर्यंत आलेल्या या परंपरेने आपापल्या वैशिष्ट्यांसह या विचाराला एका ऊंचीवर नेऊन पोहोचविले.

मध्ययुगीन काळात नाथ, वीरशैव, महानुभाव आणि वारकरी या पंथ-संप्रदायांच्या आलेला विचार तत्कालीन काळाच्या व्यवहारावर नैतिक आणि वैचारिकदृष्ट्या 'विद्रोहा'च्या स्वरूपात पुढे आला. त्याला अध्यात्माचे तात्त्विक अधिष्ठान होते, ते बुद्धाच्या मंगल तत्त्वज्ञानाचे. अशा पद्धतीने अवैदिक पद्धतीचा वारसा काहीसा विस्कळीत स्वरूपात बदलत्या परिवेशात मध्ययुगीन संतपरंपरेने बहुजन समाजापर्यंत पोहोचविला. त्यात 'सत्य-असत्यासी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता' या आत्मविश्वासाने व काहीशा धिटाईने संत तुकारामांनी या परंपरेवर कळस चढविला.

वैदिक ब्राह्मणी परंपरेने वर्णजाती संस्थेच्या सनातन दाव्यासाठी जे काही 'धर्मग्रंथ' म्हणविले जात होते, त्यांचा वापर करून त्याला शब्दप्रामाण्याची, 'सनातन'पणाची मेख मारून (समाजात) पोथी-निष्ठा कायम केली. त्यामधून भावी पिढ्यांचे हितसंबंध प्रस्थापित करून भारतीय संस्कृतीचे, समतेचे, सहिष्णुतेचे, सर्वसमावेशकतेचे तत्त्व झाकोळून टाकण्याचा प्रयत्न केला; परंतु या परंपरेविरुद्ध अवैदिक परंपरांनी तिच्या सर्व प्रकारच्या तथाकथित सैद्धान्तिक वा नैतिक दाव्याचा फोलपणा उघड केला. त्यामधील कर्मकांडाचा, अतार्किक, अवैज्ञानिक आशय उलगडून बहुजन समाजाला सावध केले. एवढेच नव्हे, तर पर्यायी सैद्धान्तिक आणि नैतिक भूमिका ठामपणे मांडून सत्यशोधनाची प्रक्रिया



Scanned with CamScanner

निरंतर सुरू ठेवली. परिणामी, या परंपरेने वैदिकांच्या कुठल्याही प्रकारच्या भेसळीला न जुमानता, विकसित होत काळानुरूप बदलत कारुण्य, सौजन्य, समानतेचा पुरस्कार करत 'सत्यशोधना'चा अमिट ठसा उमटविला.

बहुजन समाजाची ही समतावादी, न्यायदर्शी, मानवतावादी परंपरा मध्ययुगापर्यंत समकालीन युगपुरुषांच्या तत्त्वज्ञानातून पुढे आली व प्रस्थापित झाली. त्यांचे तत्त्वज्ञान, आचार त्यांच्या व्यक्तिगत वा पंथाच्या नावाने समाजात प्रसृत होऊन मान्यता पावले. परिणामी, या परंपरेला 'सत्यशोधक चळवळी'च्या आधुनिक युगातील जे काही आकृतिबंध, चौकट वा सिद्धान्त होते, त्यांची पायाभरणी परंपरेने भक्कम केली, असे म्हणता येईल. म्हणूनच पुढे सुमारे इ.स. १८४८ ते १९५० पर्यंतच्या सत्यशोधक चळवळीच्या शतकी विचारांचा प्रभाव बहुजन समाजाच्या जीवनावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कायम राहिला.

महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या जीवनातील सर्व क्षेत्रांना या विचाराने प्रभावित करून कार्यप्रवृत्त केले. ब्राह्मणी व्यवस्थेविरुद्ध लढण्यास ऊर्जा दिली, आत्मविश्वास वाढविला. म्हणूनच 'नवनिर्मिती'चा विद्रोह म. जोतीराव फुले यांच्या साहित्य व कृतीमध्ये आला होता. तोच आज तात्त्विक आणि व्यावहारिक पातळ्यांवर एका 'परंपरे'च्या रूपात 'सत्यशोधकी तत्त्वज्ञान' म्हणून मान्यता पावला आहे. प्रस्थापित ब्राह्मणी व्यवस्थेविरुद्ध लढण्यासाठी महात्मा जोतिबा फुले यांच्या आचार, विचार आणि कृतींचा आधार घेतला जातो. मग ती चळवळ जातीय अथवा वर्णीय अंगाने मांडणी करणारी असो. सत्यशोधक चळवळीच्या परंपरेचा 'वारसा' सांगत व 'वसा' घेऊनच वर्तमानातील सर्व चळवळी कार्यरत झालेल्या दिसतात. जी बाब 'चळवळी'संदर्भात खरी आहे, तीच किमान महाराष्ट्रातील विचारवंत, लेखकाच्या बाबतीतही आढळते. प्रत्यक्ष सत्यशोधक चळवळीने 'सत्यशोधक' म्हणून ही भूमिका कदाचित स्पष्टपणे मांडली नसेल. आपला तसा आग्रह देखील नसावा; परंतु त्यांची चळवळ, विचारातील स्पष्टता त्यांनी हाताळलेले मार्ग यांचा विचार करता, सत्यशोधकी पद्धतीने, बहुजन समाज सर्वांगांनी बहरून यावा, हाच आहे.

या सत्यशोधकी विचार परंपरेमध्ये आजच्या 'सत्यशोधकी साहित्या'त डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे स्थान, त्यांचे 'सत्यशोधकी साहित्य इतिहासा'तील योगदान बहुजन समाजाला अधिक उन्नत करणारे आहे. त्यांच्या सत्यशोधकी

निष्ठेबद्दल, कार्याबद्दल तसेच त्यांनी निर्माण केलेल्या इतिहासाबद्दल लिहिण्याचे कारण म्हणजे डॉ. श्रीराम गुंदेकर आज आपल्यामध्ये नाहीत. त्यांना जाऊन १२ जानेवारी २०१९ ला एक वर्ष पूर्ण होत आहे. म्हणूनच या प्रथम स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारा हा 'स्मृतिगंध' आपल्या हाती देताना दुःखाच्या आणि विरहाच्या संमिश्र भावना माझ्या मनात दाटून आल्या आहेत.

आज डॉ. श्रीराम गुंदेकर सर आपल्यात नाहीत, हे खरे आहे. तरीही मन ते मानायला तयार होत नाही. शरीराने आपल्यामध्ये नसले, तरी वैचारिकदृष्ट्या ते आपल्या सर्वांच्या खूप जवळ आहेत आणि राहतील. स्मृतिशेष डॉ. गुंदेकरसरांशी माझे नाते 'गुरु-शिष्य' म्हणून १९९७ मध्ये राजर्षी शाहू महाविद्यालयात जुळले. तीन वर्षे त्यांनी मला 'मराठी'चा पदवी अभ्यासक्रम शिकविला; पण त्यावेळी त्यांच्या फारसे निकट जाता आले नाही. पुढे तत्कालीन पुणे विद्यापीठात 'मराठी' विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करीत असताना 'डॉ. श्रीराम गुंदेकर हे मोठे ग्रामीण कथालेखक आहेत,' असे कळले. तेव्हापासून त्यांच्याप्रति असलेला आदर आणखीनच दुणावला. तत्पूर्वी त्यांच्या 'वाङ्मयीन' कर्तृत्त्वाबद्दल अनभिज्ञ असल्याबद्दल खंत वाटली. आदरणीय डॉ. नागनाथ कोतापल्ले सर त्यांचे गुरू होते, हेही कळले. परिणामी, मी डॉ. कोतापल्लेसरांशीही जवळिक साधण्याचा प्रयत्न करू लागलो. वस्तुतः, माझी साहित्याभिरुची पदव्युत्तर वर्गात असताना वृद्धिंगत झाली. डॉ. नागनाथ कोतापल्ले सर सर्व विद्यार्थ्यांशी आस्थेने बोलायचे. परिणामी, आम्ही ग्रामीण विद्यार्थी पुण्यासारख्या शहरी वातावरणात रुळू शकलो. पदव्युत्तर झाल्यानंतर 'नेट-सेट'ची तयारी सुरू केली. माझ्या काही मित्रांनी पृथ्वीराज तौर, बालाजी घारुळे आदींनी पीएच्.डी.ला प्रवेश घेतला. मीही मग एम्.फिल.साठी प्रविष्ट झालो. तेव्हा 'संशोधना'विषयी फारशी समज नव्हती. आणि डॉ. कोतापल्ले सरांच्या सल्ल्यानुसार मी 'श्रीराम गुंदेकर : कथाविश्व, स्वरूप आणि समीक्षा' हा विषय संशोधनासाठी घेतला.

डॉ. श्रीराम गुंदेकर यांच्या साहित्यावर एम्.फिल.साठी संशोधन करायचे ठरविल्यावर लातूरला गावी आल्यानंतर त्यांच्याशी संपर्क वाढला. आमचे नाते अधिक दृढ झाले. नंतर पुणे विद्यापीठातून डॉ. नागनाथ कोतापल्ले सर

औरंगाबादला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात कुलगुरु म्हणून गेले. दरम्यान, मी 'सेट' परीक्षा उत्तीर्ण झालो. शोधप्रबंधिकेसाठी वाचन, टिपा काढणे सुरू होते; पण मन पुण्यात रमेनासे झाल्याने एम्.फिल अर्धवट सोडून कायमचा गावाकडे आलो. डॉ. श्रीराम गुंदेकर यांच्या साहित्यावरील संशोधनकार्य अर्धवट राहिल्याची हुरहूर मनात कायम होती. इ.स. २००३ ते २००५ दरम्यान घड्याळी तासिका तत्त्वावर व्याख्याता होतो. इ.स. २००६ मध्ये निलंग्याच्या महाराष्ट्र महाविद्यालयात अधिव्याख्याता म्हणून मराठी विभागात कायम झालो. आरंभकाळात केवळ अध्यापनातच रमलो. इ.स. २००८-२००९ मध्ये 'पीएच्.डी.' संशोधन करावेसे वाटल्याने संशोधनविषयाच्या निश्चितीसाठी डॉ. श्रीराम गुंदेकर सरांना भेटलो. माझ्या संशोधनाविषयीचा पूर्वानुभव सरांना असल्यामुळे त्यांनी तत्काळ होकार दिला नाही. मीही मनोमन ठरविले होते की, डॉ. गुंदेकरसरांच्या साहित्यावर एम्.फिल. करता आली नाही, तरी 'केवळ त्यांच्याच मार्गदर्शनाखाली पीएच्.डी. करायची,' असा ठाम निश्चय केला होता. डॉ. श्रीराम गुंदेकर सर विद्यार्थी निवडत असताना फार काळजीपूर्वक निवड करत असत. संशोधनाबाबत गांभीर्य नसणारे विद्यार्थी त्यांना अजिबात आवडत नसत. संशोधनकार्य झटपट करून हवे असणारे विद्यार्थी गुंदेकर सरांपुढे तग धरू शकत नाहीत. सरांची अट एकच होती की, संशोधनाभ्यासात हयगय करता कामा नये. नियमाने सर्व काम करणाऱ्या, संशोधनाची शिस्त पाळणाऱ्या विद्यार्थ्यांना कधीच त्रास झाला नाही, हे मी ऐकून होतो. पुढे मलाही त्याचा प्रत्यय आला. सहसा त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी संशोधन करायला धजावत नसत. कारण संशोधनाच्या चौकटीत ते काम करवून घेत असत. अलीकडील विद्यार्थ्यांना संशोधनाचे गांभीर्य राहिले नाही, कष्ट करण्याची वृत्ती नाही. सर्व झटपट हवे असते, असे सर नेहमी म्हणत असत. मलाही त्यांनी सुरुवातीला होकार दिला नाही. मीही हार मानली नाही. विषयाची तयारी करूनच मी त्यांच्याकडे गेलो. चर्चा करताना सरांनी विचारले- ''हंसराज, तुम्हाला कशावर संशोधन करायचे आहे.'' मी म्हणालो, ''सर, मला डॉ. आ.ह. साळुंखे यांच्या साहित्यावर संशोधन करायचे आहे.'' त्यावर ''ठीक आहे. तुम्ही तीन-चार दिवसांनी फोन करून या. मी दोन दिवस गावी जाणार आहे. येताना विषयाची रूपरेखा घेऊन या. तुम्हाला काय वाटते, ते मग ठरवू. ठरल्याप्रमाणे मी फोन करून सरांच्या

घरी गेलो. सरांना लिहिलेले सर्व दाखविले. सरांनी ते काळजीपूर्वक पाहिले आणि म्हणाले, ''या विषयाला मी 'नाही' म्हणू शकत नाही. माझीही इच्छा होती. साळुंखेसरांच्या साहित्यावर कोणीतरी काम करावे.'' सरांकडे माझ्याआधी तिघांनी 'सत्यशोधकी' विषयावर पीएच्.डी.चे कार्य पूर्ण केले होते. मी चौथा आणि शेवटचा पीएच्.डी.चा विद्यार्थी ठरेन, असे तेव्हा वाटले नव्हते.

गुंदेकरांनी विषयाच्या अनुषंगाने प्रकरणे वगैरे कशी असावीत, याची चर्चा केली आणि मला 'डॉ. आ.ह. साळुंखे सरांना सातारा येथे जाऊन भेटून या. केलेले प्रकरण दाखवा. त्यांचे मार्गदर्शन घेऊन या,' असा सल्ला दिला. मी २००९ मध्ये डॉ. आ.ह. साळुंखे सरांना भेटण्यासाठी त्यांच्या घरी गेंडामाळ, सातारा येथे गेलो. त्यांच्याशी चर्चा केली. तेव्हा ते म्हणाले, ''तुम्हाला शुभेच्छा...! गुंदेकरसर मार्गदर्शक आहेत. त्यामुळे मी काही यात बदल करणार नाही. ते माझ्यापेक्षा जास्त तुम्हाला मदत करतील. तरीही कधी माझी गरज भासलीच, तर कधीही या.''

मी सर्व साधनग्रंथ विकत घेऊन परत लातूरला डॉ. गुंदेकरसरांना भेटून झालेली चर्चा सांगितली व पीएच्.डी.च्या कामाला लागलो. दरम्यान, दोन-तीन वर्षे गेली. डिसेंबर २०१३ ते डिसेंबर २०१५ या कालावधीत दोन वर्षांची एफ्.आय्.पी.अंतर्गत पूर्णवेळ रजा घेतली व राजर्षी शाहू महाविद्यालयातील मराठी संशोधनकेंद्रात डॉ. गुंदेकरसरांकडे रुजु झालो. तेव्हापासून आमचा घनिष्ट संबंध आला. या कालावधीत मला जे काही शिकायला, अनुभवायला मिळाले, ते कोठेच मिळाले नाही. विभागात डॉ. गुंदेकरसर, डॉ. भरत देशमुखसर, डॉ. संभाजी पाटील व मी रोज दुपारी एकत्र जेवण करायचे. अनेक विषयांवर चर्चा व्हायच्या. मला या सगळ्यांनी खूप चांगले वागवले. सकाळी १० ते सायंकाळी ५ असा माझा ग्रंथालयातील दिनक्रम असे. दिवसभरात झालेल्या वाचनावर दुसऱ्या दिवशी चर्चा व्हायची. माझ्या पीएच्.डी.दरम्यान गुंदेकरसरांनी 'सत्यशोधकी साहित्याचा इतिहास'चा खंड तिसरा लिहायला सुरुवात केली होती. त्यांचा तिसरा खंड आणि माझे पीएच.डी.चे काम एकत्रच सुरू होते. सर रोज चार-पाच पान लिहिल्याशिवाय घरी जात नसत, रोजच्या तासिका इतर सर्व कामे करून संपूर्ण खंडाचे लेखन विभागात बसून केले. कितीही गोंधळ, गप्पा सुरू असल्या, तरी ते लिहीत असत. मी त्यांच्याकडे बारकाईने बघत. सर वर्गात



Scanned with CamScanner

शिकवायला गेल्यास त्यांच्या टेबलवरील लेखनसंदर्भ बघत असत. त्यांची एक शिस्त होती. संदर्भ, टिपण, खुणा करण्याची, कंटाळा हा प्रकार त्यांच्या जीवनात मला कधीच पाहायला मिळाला नाही. त्यामुळे मला नकळत प्रेरणा मिळायची. सरांची एक खासीयत होती... ते एकाच छोट्या खटक्याच्या पेनाने रोज लिहीत असत. ते खूप वर्षांपासून त्यांच्याकडे होते. लातूरला एकाच दुकानात त्या पेनची रिफील मिळत असे. तेही केवळ गुंदेकरसरांसाठी दुकानदार मागवीत असे. सर एकदाच डझनभर रिफील घेऊन येत असत. मला त्यांची ही चिकाटी, संशोधनाची शिस्त पाहून आपोआप माझ्यामध्ये बदल होत गेले. कधी कंटाळा आला, तर गुंदेकर सर डोळ्यांसमोर यायचे.

सर दि. ३१ नोव्हेंबर २०१५ ला सेवानिवृत्त झाले. मीही डिसेंबर २०१५ मध्ये रजा संपल्याने माझ्या मूळ महाविद्यालयात रुजु झालो. गुंदेकरसर म्हणायचे, ''बरं झालं. माझी नोकरी आणि तुमची पीएच्.डी. सोबतच झाली. मीही सर सेवानिवृत्त होणार आहेत, म्हणून पीएच्.डी.चे काम दोन वर्षांत पूर्ण केले. प्रबंध विद्यापीठाला सादर केला. पुढे पाच-सहा महिन्यांनी म्हणजे जुलै २०१६ मध्ये मला पीएच्.डी. पदवी मिळाली. त्याचा आनंद माझ्याइतकाच गुंदेकरसरांनाही झाला होता. पीएच्.डी.च्या दोन वर्षांत खूप सारे क्षण सरांसोबत घालविले होते. अनंत आठवणी आज आहेत.

दि. ४ जानेवारी २०१७ ला डॉ. गुंदेकरसरांना मी सावित्रीबाई फुले जन्मोत्सवानिमित्त आणि मराठी भाषासंवर्धन पंधरवड्यानिमित्त माझ्या महाविद्यालयामध्ये विशेष व्याख्यानासाठी बोलावले होते. भव्य सभामंडपाच्या व्यासपीठावरून हजार-दीड हजार विद्यार्थ्यांना सरांनी सुमारे दीड तास मार्गदर्शन केले. दुपारी माझ्या घरी जेवण केले, निवांत गप्पा झाल्या. सरांनी माझ्या नवीन वास्तुच्या बांधकामाची पाहणी करताना 'खूप समाधान वाटले. आज हे पाहून' अशी प्रतिक्रिया दिली. निलंग्याची त्यांची ती शेवटची भेट असेल, असे स्वप्नातदेखील वाटले नव्हते. दि. ११ जानेवारीला सायंकाळी सहाच्या सुमारास डॉ. भरत देशमुख सरांचा फोन आला, ''अरे हंसराज, गुंदेकरसरांना विवेकानंद हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले आहे, आम्ही सर्वजण तिथेच आहोत.'' मी विचारले, ''सर, मी येऊ का लगेच?'' डॉ. देशमुखसर म्हणाले, ''घाई करू नकोस. उद्या फोन करतो. मग ये.'' मला वाटलं, नॉर्मल असेल; पण तरीही

"उद्या जाऊया," असे पत्निला म्हणालो. दुसऱ्या दिवशी सर गेल्याचं कळताच प्रचंड धक्का बसला.

बघता-बघता गुंदेकर सरांना जाऊन १२ जानेवारी २०१९ ला एक वर्ष होत आहे. त्यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या आठवणीचा धांडोळा 'स्मृतिगंध'रूपाने सर्व चाहत्यांसमोर ठेवताना एकीकडे त्यांचा विद्यार्थी म्हणून गहिवरलोय्, तर दुसरीकडे या संपादनाच्या माध्यमातून त्यांच्यावर प्रेम करणारे मित्र, नातेवाइक त्यांच्या चाहत्यांच्या आठवणी-एकत्रित करता आल्या आणि डॉ. श्रीराम गुंदेकर यांना प्रथम स्मृतिदिनानिमित्त शब्दाच्या माध्यमातून, श्रद्धांजली देता आली, याचे समाधानदेखील आहे.

'सत्यशोधक डॉ. श्रीराम गुंदेकर स्मृतिगंध'चे तीन विभागांत विभाजन केले आहे. पहिल्या विभागात डॉ. गुंदेकर सरांच्या कार्यकर्तृत्त्वाच्या आठवणींचे कांही लेख आहेत. त्यामध्ये त्यांची कन्या सारिका, पत्नी संजीवनी यांच्यापासून डॉ. आ.ह.साळुंखे, डॉ. बाबा आढाव, डॉ. भारत पाटणकर, प्रा.डॉ. गेल ऑम्व्हेट, डॉ. गुंदेकरसरांचे गुरू डॉ. नागनाथ कोतापल्ले, वर्गमित्र भाई जनार्दन तुपे, सुशीला मोराळे व त्यांच्या गावांतील काही आप्तेष्टांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. सत्यशोधक चळवळीतील काही साथी प्रा. प्रतिमा परदेशी, कॉ.डॉ. धनाजी गुरव, सतीश जामोदकर, डॉ. रावसाहेब ढवळे, डॉ. आनंद मेणसे, प्रा. नूतन माळवी यांचेही महत्त्वपूर्ण लेख आहेत.

दुसऱ्या भागात डॉ. श्रीराम गुंदेकरांच्या सत्यशोधकी साहित्याची मीमांसा करणारे डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. सूर्यनारायण रणसुभे, प्रा. रामप्रसाद तौर, डॉ. भास्कर शेळके व डॉ. जयद्रथ जाधव यांचे अभ्यासपूर्ण लेख आहेत.

तिसऱ्या विभागात छायाचित्रातून उलगडणारे डॉ. श्रीराम गुंदेकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे काही पैलू क्षणचित्रांच्या माध्यमातून पाहावयास मिळतील. परिशिष्टात डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे परभणी येथील विद्रोही साहित्यसंमेलनाचे अध्यक्षीय भाषण मुद्दामहून छापले आहे. वाचकांना त्यांच्या विचारकार्याची कल्पना येण्यास अध्यक्षीय भाषण पूरक ठरेल. शेवटी त्यांचा संक्षिप्त परिचय दिला आहे. 'सत्यशोधक डॉ. श्रीराम गुंदेकर स्मृतिगंध'च्या निर्मितीत सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवर तसेच स्नेहीजनांचे ऋण व्यक्त करणे हे 'संपादक' म्हणून माझे इतिकर्तव्य समजतो.



Scanned with CamScanner


'डॉ. श्रीराम गुंदेकर सरांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त काहीतरी करावे,' या त्यांची कन्या सारिका आणि पत्नी संजीवनी यांच्याशी झालेल्या चर्चेतून आलेल्या विचाराला मूर्त रूप देण्यासाठी प्रा. रामप्रसाद तौर यांच्या अध्यक्षतेखाली नांदेडला नोव्हेंबर २०१८ मध्ये एक बैठक घेण्यात आली. तीत डॉ. शेषेराव मोहिते, डॉ. भरत देशमुख, डॉ. मा.मा. जाधव, डॉ. दिलीप चव्हाण, डॉ. कमलाकर चव्हाण, सुप्रिया गायकवाड, डॉ. संभाजी पाटील व डॉ. हंसराज भोसले यांची चर्चा होऊन स्मृतिग्रंथ काढण्याचे निश्चित झाले. त्याचे स्वरूप कसे असावे, याचीही चर्चा झाली. त्यानंतर नोव्हेंबरमध्ये लातूरला ॲड्. मनोहरराव गोमारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस कॉ.डॉ. विठ्ठल मोरे, डॉ. भरत देशमुख, प्रा. श्याम आगळे, प्रताप माने, प्रा. उद्धव कोळपे, विजय चव्हाण, डॉ. जयद्रथ जाधव, डॉ. राजशेखर सोलापुरे, प्राचार्य माधव गादेकर, डॉ. सुभाष कदम, डॉ. संभाजी पाटील, डॉ. हंसराज भोसले आदी उपस्थित होते. 'सत्यशोधक डॉ. श्रीराम गुंदेकर स्मृतिगंध'च्या निर्मितीत मौलिक सहकार्य करणारे प्रा. सुदर्शन मोरे, डॉ. भरत देशमुख, डॉ. संभाजी पाटील, डॉ. जयद्रथ जाधव यांचे विशेष आभार. निर्दोष अक्षरजुळणी अल्पावधीत करून देणारा माझा सहकारी नामदेव गाडीवान, मुखपृष्ठकार शिवाजी हांडे यांचेही ऋण व्यक्त करणे गरजेचे आहे. याकामी डॉ. श्रीराम गुंदेकर यांची कन्या सारिका हिने खूप कष्ट घेतले. तिचेही मनापासून आभार. शेवटी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष ज्यांचे-ज्यांचे सहकार्य लाभले, त्या सर्वांचे आभार! पहिल्या स्मृतिदिनानिमित्त आपण सर्वजण आस्थेने उपस्थित राहिलात, त्याबद्दल आपले स्वागत आणि आभार! कांही लेखांचा या स्मृतिगंधामध्ये वेळे अभावी समावेश करता आला नाही याबद्दल दिलगीरी व्यक्त करुन थांबतो.


*सत्य की जय हो ।*

**प्रा.डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले**

Scanned with CamScanner






ISBN 978-81-910359-3-3
9 788191 035933

Scanned with CamScanner

□ स्मृतिगंध: सत्यशोधक डॉ. श्रीराम गुंदेकर

□ संपादक: **डॉ. हंसराज भोसले**

□ ISBN No. ९७८-८१-९१०३५९-३-३

□ प्रथमावृत्ती: १२ जानेवारी २०१९
(डॉ. श्रीराम गुंदेकर प्रथम स्मृति दिन)

□ प्रकाशक:
सत्यशोधकी साहित्य प्रकाशन, लातूर
हक्क: **सारिका श्रीराम गुंदेकर**
बळीराजा, प्रकाश नगर,
बार्शी रोड, लातूर ४१३५३१

□ अक्षरजुळवणी: **नामदेव गाडीवान**, निलंगा

□ मुद्रित शोधक: **मिलींद सोनार**

□ मुखपृष्ठ: **शिवाजी हांडे**, लातूर

□ मुद्रक: **आर्टी ऑफसेट, लातूर**